महाराष्ट्र लोकसेवा आयोग

Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५ १/२, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२७९५९०० फॅक्स : २२८८०५२४

फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


# संचालक, सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, औरंगाबाद, गट - अ

**धारिका क्रमांक : २२४६/७०७/पंधरा**

**जाहिरात क्रमांक : ४४/२०१८**

आयोगामार्फत महाराष्ट्र शासनाच्या **सामान्य प्रशासन विभागांतर्गत संचालक, सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, (औरंगाबाद) गट - अ पदाच्या १ जागेसाठी ऑनलाईन** पध्दतीने **अर्ज** मागविण्यात येत आहेत. या पदासाठी खालील अटी व अर्हतांची पूर्तता करणारे उमेदवार अर्ज करु शकतात.

**२ . उपलब्ध पदसंख्या :- १**

| जात प्रवर्ग | अ.जा | अ.ज | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| **सर्वसाधारण** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| **अ)महिला (३०%)** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **ब)खेळाडू(५%)** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |

**२.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.२** शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक संकिर्ण २०१०/प्र.क्र.३५५/का-२८ मंत्रालय मुंबई-३२ दि. १३ जानेवारी २०११ नुसार (अ) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायू (locomotor disability or cerebral palsy) प्रवर्गाचे दिव्यांग असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी अर्ज करण्यासाठी पात्र आहेत.

**३.** वेतनश्रेणी : रु. १५६००- रु. ३९१००/-, ग्रेड पे रु. ७६००/- अधिक इतर भत्ते -

**४. पात्रता विषयक अटी**

**४.१** भारतीय नागरीक असणे आवश्यक आहे.

**४.२ वय – १) दिनांक १ जानेवारी, २०१९** रोजी सर्व उमेदवारांकरीता५५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**४.३ शैक्षणिक अर्हता -** The candidate

i) is a member of the Armed Forces of the union holding a post of Colonel or any higher post in the Indian Army or an equivalent post in the Indian Navy or Indian Air Force or who had held such post and is duly ritired;

ii) possess a bachelors degree in any faculty of any statutory University or an equivalent examination recogniszed in Defence Forces; and

iii) has adequate Knowledge of Marathi.

iv) Candidate should have passed MS-CIT exam or he should pass this exam within a period of one year after joining.

**टीप - १)** पदवीधर उमेदवार उपलब्ध नसल्यास कला, विज्ञान किंवा वाणिज्य या शाखेतील इंटरमिजिएटची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचा विचार केला जाईल.

**२)** जर आवश्यक दर्जाचा अधिकारी उपलब्ध नसेल तर भारतीय संघराज्याच्या सशस्त्र दलातील लेफ्टनंट कर्नल दर्जापेक्षा कमी नसलेले पद भूषविणारा निवृत्त अधिकारी अथवा नौदल / हवाई दलातील तत्सम दर्जाचा निवृत्त अधिकारी यांचा विचार करण्यात येईल.

**३)** या पदासाठी नेमणूक प्रथमत: ३ वर्षासाठी, त्यानंतर वर्षा - वर्षाला मुदत वाढविता येईल, एकूण ६ वर्षापर्यंत मुदत वाढविता येईल, एकूण ६ वर्षापर्यंत मुदत.

**५.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून

उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव किंवा अन्य योग्य निकष याच्या आधारे निकष निश्चित करुन अथवा **चाळणी परीक्षेद्वारे** मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथील केला जाणार नाही. चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येतील. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत **"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना"** मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**६. जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.**

७. कर्तव्ये व जबाबदाऱ्या - प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

८. शुल्क : -

८.१. अमागास उमेदवारांकरिता - रु. ५२४/- मागासवर्गीय उमेदवारांकरिता - रु. ३२४/-

८.२. मागासवर्गीय उमेदवार वयोमर्यादेत बसत असल्यासच अर्ज करु शकतील.

९. अर्ज करण्याची पध्दत –

९.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

९.२ पात्र उमेदवारांना वेब-बेस्ड (Web-based) ऑन लाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक २६ सप्टेंबर, २०१८ ते दिनांक १६ ऑक्टोबर, २०१८** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

९.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www. mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

९.४ विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

९.५ आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे (२) नेटबँकिंग (३) डेबीट कार्ड (४)क्रेडिट कार्ड (५) संग्राम केंद्र/ सीएससी (नागरीक सेवा केंद्र)

९.६ https://mahampsc.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतींमध्ये) आणि सीएससी ची सूची उपलब्ध आहे.

९.७ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील “ माझे खाते ” या लिंक वर क्लिक करावे.

(२) “माझे खाते ” या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर ‘ Unpaid ’ असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी ‘Pay Now’ अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) “Pay Now” या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील.

(१) ऑनलाईन पेमेंट (२) नागरी सुविधा केंद्र (३)चलानाद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

१०. चाळणी परीक्षा घ्यावयाचे ठरल्यास सदर परीक्षेच्या अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांका नंतर व परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर

उमेदवारास प्रवेश प्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलव्दारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमदेवाराने चाळणी परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व चाळणी परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**११.** चाळणी परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय चाळणी परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१२. मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांना, मुलाखतीचे वेळी सर्व मुळ प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीच्या वेळी सादर न केल्यास अथवा ती योग्य नसल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल याची कृपया नोंद घ्यावी.**

**१३.** चाळणी परीक्षा झाल्यास त्या परीक्षेचे गुण व मुलाखतीचे गुण एकत्रितरित्या विचारात घेऊन तर चाळणी परीक्षा न झाल्यास केवळ मुलाखतीच्या गुणांच्या आधारे उमेदवाराची शिफारस करण्यात येईल.

**१४.** आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

**१५. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन ऑनलाईन शुल्क भरण्याची, तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक १६ ऑक्टोबर, २०१८ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

**१६. चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक १७ ऑक्टोबर, २०१८ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

**ठिकाण :- मुंबई**
**दिनांक :- २६ सप्टेंबर, २०१८**

**उपसचिव, (सरळ सेवा - १)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**